**नियमित दिवाणी दावा क्र. ७४/२०१७**
**प्रदिप शिंदे वि. फुलाबाई शिंदे**

## नि.क्र. ४७ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रस्तुतच्या दाव्यातील प्रतिवादी क्र. २ दिलीप शिवाजी शिंदे यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, दाव्यातील प्रतिवादी क्र. २ दिलीप शिवाजी शिंदे हे दि. १६.११.२०२० रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र.२ दिलीप शिवाजी शिंदे यांनी मृत्युपत्र अगर व्यवस्थपत्र न करता इंटस्टेट असे मयत झालेले आहेत. मयत प्रतिवादी क्र. २ दिलीप शिवाजी शिंदे हे हिंदू होते. मयत प्रतिवादी क्र. २ दिलीप शिवाजी शिंदे यांचे खालीलप्रमाणे वारस रेकॉर्डवर आणणेची विनंती केली आहे.

| अ.क्र. | नाव | नाते |
|---|---|---|
| २/१ | श्रीमती मेघा दिलीप शिंदे<br>व.व. ४७, धंदा – घरकाम,<br>रा. घाटनांद्रे,<br>ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली | पत्नी |

वर नमुद केले प्रमाणे मयत प्रतिवादी क्र. २ दिलीप शिवाजी शिंदे यांना मेघा

ही पत्नी म्हणून इतकेच कायदेशीर वारस आहे. या व्यतिरीक्त त्यांना अन्य कोणीही वारस नाहीत. तरी सदर वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुतच्या अर्जावर प्रतिवादी क्र. २ च्या वारसांचे म्हणणे मागविण्याकरीता नोटीस पाठवण्यात आली. परंतु वारसांनी हजर होवून आपले म्हणणे दाखल केले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २/१ यांचे विरुध्द विना म्हणणे चालविण्यात आला.

५. वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे सरस निरस मानाने तुटक वाटपाकरीता वगैरे दाखल केला आहे. वादीने निशाणी क्र. ३९ च्या यादीसोबत प्रतिवादी क्र. २ यांचे मूळ मृत्युचे दाखले सादर केलेले आहे.

६. प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, सदरच्या दाव्यात वादी–प्रतिवादीचे स्थावर मिळकतीबाबतचे हक्क व अधिकारांशी निगडीत आहे. त्यामुळे अर्जातील कारण विचारात घेता न्यायदानाच्या दृष्टीने प्रस्तुतचा दावा गुणदोशावर निकाली काढण्याकामी मयत प्रतिवादी क्र. २ यांचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे.

७. सबब, वरिल कायदयाच्या तरतुदीचा विचार करता प्रस्तुतचा दावा गुणदोशावर निकाली काढण्याकामी मयत प्रतिवादी क्र. २ चे वारस अभिलेखावर असणे अत्यंत आवश्यक आहे. सबब सदर अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**आदेश**

१. अर्ज नि.क्र. ४७ मंजुर करण्यात येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र. २ दिलीप शिवाजी शिंदे यांचे उपरोक्त नमुद वारस यांना प्रतिवादी क्र. २/१ म्हणून समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादीने विहीत मुदतीमध्ये आवश्यक ती पूर्तता करावी.

MAHESH ARVINDRAO KULKARNI
Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.03.23 11:14:00 +0530

**कवठेमहांकाळ** **( एम. ए. कुलकर्णी )**

दिनांक:– २०.०३.२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क स्तर, कवठेमहांकाळ

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 20.03.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 20.03.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 20.03.2026 |